**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग,**
**आदिवासी विकास भवन,**
**गडकरी चौक,नाशिक**

दुरध्वनी क्रमांक : ०२५३-२५७५८१६/२५७८५६८/२३११८६४

# - जाहिरात -

अपर आयुक्त,आदिवासी विकास, नाशिक हे त्यांचे कार्यक्षेत्रातील नाशिक /कळवण /नंदूरबार/ तळोदा /यावल व राजूर या सहा प्रकल्पांतर्गत कार्यालयीन तसेच शासकीय आश्रमशाळा (निवासी) व शासकीय वसतिगृहातील खालील संवर्गाच्या रिक्त पदांकरिता विहीत नमुन्यातील अर्ज मागवित आहेत.

| अ. क्र. | पद कोड | संवर्गा | एकूण रिक्त पदे | समांतर आरक्षण | सामाजिक आरक्षण ( प्रवर्ग ) | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | अ. जा. | अ. ज. | भ.ज. | | | | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
| | | | | | | | वि. जा.अ. | ब | क | ड | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ |
| | कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक (शिक्षण सेवक) | | | | | | | | | | | | | |
| १ | ११ | इंग्रजी | १८ | खेळाडू | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ५ | ६ |
| | १२ | गणित | १० | अपंग(अशंत: अंध-१, अंशत: कर्णबधीर-१, अस्थिव्यंग-१) | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | ३ |
| | १३ | प्राणीशास्त्र/ वनस्पतीशास्त्र | १८ | | | | | | | | | | | |
| | १४ | भौतिकशास्त्र/ रसायनशास्त्र | ९ | | | | | | | | | | | |
| | १५ | समाजशास्त्र / राज्यशास्त्र | १८ | माजी सैनिक | ३ | १ | १ | ० | १ | ० | १ | ० | १० | १७ |
| | १६ | अर्थशास्त्र | १८ | महिला | ९ | ६ | २ | १ | २ | १ | १ | ० | ३६ | ५८ |
| | १७ | इतिहास / भूगोल | १८ | सर्वसाधारण | २ | १ | २ | २ | १ | १ | २ | ० | ३२ | ४३ |
| | १८ | मराठी | १८ | | | | | | | | | | | |
| | | | | एकूण | १५ | ८ | ६ | ३ | ४ | २ | ४ | ० | ८५ | १२७ |
| २ | १९ | गृहपाल (पुरुष) | ५३ | खेळाडू | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | १ | ४ |
| | | | | अपंग (अशंत: अंध,१ अशंत अस्थिव्यंग-१) | | | | | | | | १ | १ | २ |
| | | | | सर्वसाधारण | ८ | ० | १ | १ | २ | १ | २ | ८ | २५ | ४८ |
| | | | | एकूण | ९ | ० | १ | १ | २ | १ | २ | १० | २७ | ५३ |
| ३ | २० | गृहपाल (स्त्री) | २९ | खळाडू | १ | | | | | | | | २ | ३ |
| | | | | अपंग (अशंत: अंध-१, अस्थिव्यंग-१) | १ | | | | | | | १ | १ | ३ |
| | | | | सर्वसाधारण | २ | ० | १ | १ | २ | ० | १ | ३ | १३ | २३ |
| | | | | एकूण | ४ | ० | १ | १ | २ | ० | १ | ४ | १६ | २९ |

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | २१ | अधिक्षक (पुरुष ) | १२५ | खेळाडू | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ३ | ४ |
| | | | | अपंग | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | ३ | ५ |
| | | | | माजी सैनिक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ५ | १५ | २० |
| | | | | सर्वसाधारण | १ | १ | ४ | ३ | ५ | २ | ० | ४ | ७६ | ९६ |
| | | | | एकूण | १ | १ | ४ | ३ | ६ | २ | ० | ११ | ९७ | १२५ |
| ५ | २२ | अधिक्षक (स्त्री ) | १६५ | खेळाडू | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | १ | ३ | ६ |
| | | | | अपंग | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ३ | ४ |
| | | | | सर्वसाधारण | ४ | ० | ६ | ५ | ८ | ४ | २ | २७ | ९९ | १५५ |
| | | | | एकूण | ५ | ० | ७ | ५ | ८ | ४ | २ | २९ | १०५ | १६५ |
| ६ | २३ | प्राथमिक शिक्षण सेवक (मराठी माध्यम) | १०१ | खेळाडू | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ३ | ३ |
| | | | | अपंग (अशंत: अंध-१, अंशत: कर्णबधीर-१, अस्थिव्यंग-१) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ३ | ३ |
| | | | | माजी सैनिक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १५ | १५ |
| | | | | महिला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ३० | ३० |
| | | | | सर्वसाधारण | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ५० | ५० |
| | | | | एकूण | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १०१ | १०१ |
| ७ | २४ | प्राथमिक शिक्षण सेवक (इंग्रजी माध्यम | १८ | खेळाडू | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | | | | अपंग(अशंत: अंध-१, | ० | | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | १ |
| | | | | माजी सैनिक | ० | ० | ० | ० | ० | | ० | ० | ० | ० |
| | | | | महिला | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | २ | ० | ३ |
| | | | | सर्वसाधारण | १ | १ | १ | १ | १ | १ | ० | २ | ५ | १३ |
| | | | | एकूण | १ | २ | १ | १ | १ | १ | ० | ५ | ६ | १८ |
| ८ | २५ | ग्रंथपाल | १९ | खेळाडू | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | | | | अपंग (अंशत: कर्णबधीर १) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | | | | माजी सैनिक | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | ३ |
| | | | | महिला | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | ३ |
| | | | | सर्वसाधारण | १ | १ | १ | ० | १ | ० | ० | २ | ५ | ११ |
| | | | | एकूण | ३ | १ | १ | ० | १ | ० | ० | ४ | ९ | १९ |
| ९ | २६ | प्रयोगशाळा सहाय्यक | ११ | अपंग (अस्थिव्यंग-१) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | | | | माजी सैनिक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | २ |
| | | | | महिला | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | २ | ५ |
| | | | | सर्वसाधारण | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | २ | ३ |
| | | | | एकूण | १ | १ | ० | ० | १ | ० | ० | २ | ६ | ११ |
| १० | २७ | लिपीक तथा टंकलेखक | ३२ | खेळाडू | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | | | | अपंग (अस्थिव्यंग-१) | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ |
| | | | | माजी सैनिक | ० | ० | १ | १ | १ | ० | १ | ० | १७ | २१ |
| | | | | महिला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ४ | ४ |
| | | | | सर्वसाधारण | ० | ० | ० | ० | २ | ० | ० | ० | ३ | ५ |
| | | | | एकूण | ० | ० | १ | १ | ३ | ० | २ | ० | २५ | ३२ |
| | | | एकूण | | | | | | | | | | | |

टिप : वर नमूद पदसंख्येत तसेच आरक्षणात बदल होऊ शकतो.

-- पद निहाय आवश्यक शैक्षणिक अर्हता --

| पद कोड | आवश्यक शैक्षणिक अर्हता (दिनांक १ ऑगष्ट २००९ पर्यंत धारण केलेली असावी) |
|---|---|
| ११ | एमए.(इंग्रजी ) बीएड ( पहिली मेथड इंग्रजी आवश्यक ) पदवी परिक्षेतील दुय्यम विषय राज्यशास्त्र/समाजशास्त्र/इतिहास |
| १२ | एम.एस्सी.(गणित ) बीएड ( पहिली मेथड गणित आवश्यक ) पदवी परिक्षेतील दुय्यक विषय भौतिकशास्त्र / रसायनशास्त्र |
| १३ | एम.एस्सी.(प्राणीशास्त्र किंवा वनस्पतीशास्त्र) बीएड ( पहिली मेथड प्राणीशास्त्र किंवा वनस्पतीशास्त्र आवश्यक ) पदवी परिक्षेतील दुय्यम विषय भौतिकशास्त्र/रसायनशास्त्र/प्राणीशास्त्र /वनस्पतीशास्त्र |
| १४ | एम.एस्सी.(भौतिकशास्त्र किंवा रसायनशास्त्र) बीएड ( पहिली मेथड भौतिकशास्त्र किंवा रसायनशास्त्र आवश्यक ) पदवी परिक्षेतील दुय्यम विषय गणित/भौतिकशास्त्र/रसायनशास्त्र/ प्राणीशास्त्र /वनस्पतीशास्त्र |
| १५ | एम.ए.(समाजशास्त्र/राज्यशास्त्र) बीएड ( पहिली मेथड समाजशास्त्र/ राज्यशास्त्र आवश्यक ) पदवी परिक्षेतील दुय्यम विषय राज्यशास्त्र/समाजशास्त्र/इतिहास |
| १६ | एम.ए.(अर्थशास्त्र) बीएड ( पहिली मेथड अर्थशास्त्र आवश्यक ) पदवी परिक्षेतील दुय्यम विषय राज्यशास्त्र/समाजशास्त्र/इतिहास |
| १७ | एम.ए.(इतिहास किंवा भूगोल) बीएड ( पहिली मेथड इतिहास किंवा भूगोल आवश्यक ) पदवी परिक्षेतील दुय्यम विषय राज्यशास्त्र/ समाजशास्त्र/इतिहास/भूगोल |
| १८ | एम.ए.( मराठी) बीएड (पहिली मेथड मराठी आवश्यक ) पदवी परिक्षेतील दुय्यम विषय राज्यशास्त्र/समाजशास्त्र/ इतिहास/ भूगोल |
| १९<br>२० | समाजकार्य किंवा समाज कल्याण प्रशासन किंवा आदिवासी कल्याण किंवा आदिवासी कल्याण प्रशासन शाखेतील मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदव्युत्तर पदवी ( M.S.W.) |
| २१<br>२२ | समाजकार्य किंवा समाज कल्याण प्रशासन किंवा आदिवासी कल्याण किंवा आदिवासी कल्याण प्रशासन शाखेतील मान्यता प्राप्त विद्यापिठाची पदवी ( B.S.W.) |
| २३ | प्राथमिक शिक्षक सेवक पदाकरिता एस.एस.सी /एच.एस.सी.डी.एड./ए.टी.डी. अर्हताधारण करणारे (CET) उत्तीर्ण झालेले उमेदवारच अर्ज करण्यास पात्र राहतील. |
| २४ | प्राथमिक शिक्षक सेवक पदाकरिता एस.एस.सी /एच.एस.सी.डी.एड./ए.टी.डी. अर्हताधारण करणारे (CET) उत्तीर्ण झालेले उमेदवारच अर्ज करण्यास पात्र राहतील. रिक्त जागा इंग्रजी माध्यमाच्या आश्रमशाळेकरिता आहेत. सदर रिक्त जागांसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांचे शिक्षण इ.१ ली पासून डी.एड.पर्यत इंग्रजी माध्यमातून झालेले असावयास हवे. |
| २५ | १) ज्यांनी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण केली आहे.<br>२) ज्यांनी ग्रथालय प्रशिक्षण यामधील शासन मान्यताप्राप्त महाविद्यालयाचे अथवा संस्थेचे प्रमाणपत्र धारण केले आहे. परंतु ग्रंथालय शास्त्र यामधील पदविका धारण करणाऱ्या आणि किमान २ वर्षापेक्षा कमी नाही इतका ग्रंथालय कामाचा अनुभव असलेल्या उमेदवारांना पसंतीक्रम राहील. |
| २६ | १) ज्यांनी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केली आहे. |
| २७ | २) ज्यांनी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण केली आहे.<br>३) जे मराठी टंकलेखक ३० श.प्र.मि.व इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि.(गव्हर्नमेंट कमर्शियल सर्टिफिकेट ) अर्हता धारण करतात. |

अ.क्र.१ ते ११ वरील पदांसाठी शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेली संगणक हाताळणी / वापराबाबतचे प्रमाणपत्र धारण करणेसंबधी केलेल्या अथवा भविष्यात केल्या जाणाऱ्या नियमानुसार धारण करणे आवश्यक.

**वयोमर्यादा** : दिनांक १/८/२००९ रोजी उमेवाराचे वय १८ पेक्षा कमी नसावे व सर्वसाधारण उमेदवारांसाठी ३३ वर्ष व अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, इतर मागास वर्ग यांचेसाठी ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे. ( माजी सैनिक /अपंग/ स्वातंत्र्य सैनिक नामनिर्देशित पाल्यांकरिता शासन नियमुनसार शिथिलक्षम )

**वेतनश्रेणी :- (पाचव्या वेतनआयोगाप्रमाणे)**

१) पदक्रमांक १ साठी ३ वर्षापर्यत एकत्रित मानधन दरमहा रु.५,०००/- उपरोक्त मुदतीत काम समाधानकारक राहिल्यास त्यांना नियमित वेतनश्रेणी रु.७२२५-२२५-११०५० .

२) पद क्रमांक २ व ३ साठी वेतनश्रेणी रु.५५००-१७५-९०००/-

३) पद क्रमांक ४ व ५ साठी वेतनश्रेणी रुपये-४०००-१००-६०००/-

४) पद क्रमांक ६ व ७ साठी ३ वर्षापर्यत एकत्रित मानधन दरमहा रु.३,०००/- अप्रशिक्षितांस एकत्रित मानधन दरमहा रुपये १,५००/- उपरोक्त मुदतीत काम समाधानकारक राहिल्यास त्यांना नियमित वेतनश्रेणी रुपये ४५००-७०००/-

५) पद क्रमांक ८ साठी रु. ४०००-१००-६०००

६) पद क्रमांक ९ साठी रु.३२००-४९००/-

७) पद क्रमांक १० साठी रु.३०५०-७५-३९५०-८०-४५९०/-

**उमेदवार निवडीची पध्दती :-**

१) पद कोड ११ ते २२ साठी मराठी, इंग्रजी, सामान्यज्ञान व बौध्दीक चाचणी या विषयांवरील प्रश्नांकरिता २५ गुण याप्रमाणे १०० गुणांची व पदवी परीक्षेला असलेल्या सर्व विषयावर आधारीत १०० गुणांची व्यावसायिक ज्ञान चाचणी अशी एकूण २०० गुणांची लेखी परीक्षा असेल. व्यावसायिक ज्ञान चाचणी पद क्रं. ११ ते १४ साठी इंग्रजी भाषेतून व पद क्रं. १५ ते १८ साठी मराठी माध्यमातून असेल.

२) पद सांकेतांक १९ ते २४ साठी मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौध्दीक चाचणी या विषयांवरील प्रश्नांची प्रत्येकी ५० गुण याप्रमाणे २०० गुणांची लेखी परीक्षा असेल.

३) पद कोड २५ ते २७ साठी माध्यमिक शालांत परिक्षा ( इयत्ता १० वी ) दर्जाची मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व अंकगणित या विषयांवरील प्रश्नांची प्रत्येकी ५० गुण याप्रमाणे २०० गुणांची लेखी परिक्षा असेल.
पद क्रं. १९ ते २७ साठी लेखी परीक्षेच्या प्रश्नपत्रिका केवळ मराठी भाषेमधून राहील. मात्र इंग्रजी विषयाचे प्रश्न इग्रजी भाषेत राहील.

लेखी परीक्षेत गुणवत्तेनुसार पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची त्याचे विषयानुसार तोंडी मुलाखत घेतली जाईल. तोंडी मुलाखतीचे २५ गुण राहतील.

***४) अर्ज करण्याची पध्दत व सर्वसाधारण सूचना.***

१) जाहिरातीत विहित केलेल्या नमून्यात अर्ज करावा. अपूर्ण अर्ज किंवा नमून्यानुसार क्रमाने माहिती न भरलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

२) सर्व शैक्षणिक अर्हता, जन्म तारखेचा पुरावा ,जातीचा दाखला इ.प्रमाणपत्राच्या सत्यप्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

३) परिपूर्ण स्थितीत अर्ज लिफाफ्यावर इंग्रजीत ठळक अक्षरात पदाचे नांव व पद कोड नमूद करुन **POST BOX NO.9706, BORIVALI (EAST)[ MUMBAI 400 066** या पत्यावर दि. ३१/८/२००९ पर्यत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत अथवा त्यापूर्वी पोहोचतील अशा रितीने फक्त साध्या डाकेने पाठविण्यांत यावेत. हस्तेपोहोच /रजिस्टर्ड/स्पीडपोस्ट ने पाठवलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

४) शासकीय अथवा निमशासकीय सेवेत असणाऱ्या उमेदवारांनी त्यांचे अर्ज परस्पर विहित केलेल्या दिनांकापर्यत पोहोचतील या बेताने पाठवावेत. मात्र अशा कर्मचाऱ्यांनी मुलाखतीच्या वेळी नियुक्ती प्राधिकाऱ्याचे ना-हरकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहिल.

५) नमूद केलेल्या तारखेनंतर आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

६) उमेदवारांना मराठी भाषेचे पर्याप्त ज्ञान असणे आवश्यक आहे.

७) लेखी परिक्षेसाठी व मुलाखतीसाठी स्वखर्चाने यावे लागेल.

८) कोणत्याही कारणाने उशिरा आलेला अर्ज स्वीकृत केले जाणार नाहीत. विहित दिनांकानंतर पोष्टाद्वारे प्राप्त होणारे सर्व अर्ज रद्द केले जातील. त्यांची कोणतीही जबाबदारी कार्यालय प्रमुखांवर राहणार नाही.

९) निवड झालेल्या उमेदवारांना विभागातील कार्यक्षेत्रांतर्गत असलेल्या जिल्यातील कोणत्याही ठिकाणी नेमणूक दिली जाईल. या विभागाच्या आश्रमशाळा निवासी असल्याने मुख्यालयी राहणे बंधनकारक राहील.

१०)अनुसूचित जमातीच्या उमेदवारांनी जमाती वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. त्याशिवाय त्यांच्या नियुक्तीचा विचार केला जाणार नाही.

११)उमेदवाराने अर्जासोबत जोडलेल्या गुणपत्रिका /प्रमाणपत्र व दस्तऐवजांच्या प्रती राजपत्रित अधिकाऱ्यांकडून स्वाक्षांकित करुन पाठविणे आवश्यक राहील. अन्यथा त्यांचे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

१२)अर्जदारोन प्रत्येक अर्जासोबत खालील निश्चित केलेल्या दराप्रमाणे फक्त राष्ट्रीयकृत बँकेचा “सहाय्यक प्रकल्प अधिकारी, अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक” यांचे नांवे धनादेश (Demand Draft) काढून अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.. याव्यतिरिक्त अन्य कुठल्याही स्वरुपात शुल्क स्विकारले जाणार नाही. विहित शुल्क नसलेले अर्ज रद्दबातल होतील. अपंग उमेदवारांसाठी ते ज्या प्रवर्गातील असतील त्या प्रवर्गानुसार आवेदन शुल्क लागू राहील.

| अ.क्र. | पदकोड | खुला प्रवर्ग | राखीव प्रवर्ग (अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, इतर मागास वर्ग) |
|---|---|---|---|
| १) | पद क्रमांक ६, ७ | रु.१५०/- | रु.७५/- |
| २) | पद क्र.१, २, ३, ४, ५, ८, ९ व १० | रु.२००/- | रु.१००/- |

**माजी सैनिकांना अर्जासोबत आवेदन शुल्क भरण्याची अट लागू नाही.**

१३)अर्जात चुकीच्या किंवा अपूर्ण नोंदी असल्यास व योग्य पात्रताधारक नसल्याचे आढळून आल्यास असा अर्ज चिारात घेतला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

१४)अर्जदार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

१५)महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती ( विमुक्त जाती) , भटक्या जमाती, विशेष मागासप्रवर्ग , इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम २००१ ( सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.८ ) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक २९/१/२००४ पासून अंमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगत गटाचे तत्व ( क्रिमीलेयर) विजा-अ, भ.ज.(ब,क,ड) इतर मागासप्रवर्ग व विशेष मागासप्रवर्ग यांना लागू आहे. या प्रवर्गातील उमेदवारांनी जात, उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सन २००८-२००९ या कालावधीतील ( नॉन क्रिमीलेअर ) प्रमाणपत्र धारण केले असले पाहिजे.

१६)महिला आरक्षण हे शासन निर्णय महिला व बालकल्याण विभाग क्र.८२/२००१ मसेआ-२०००/प्र.क्र.४१५/ का.२ दि.२५/५/२००१ मधील तरतूदीनुसार राहिल. खुल्या प्रवर्गातील महिलांना उन्नत आणि प्रगत व्यक्ती गट यामधे मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिकारी यांचे सन २००८-०९ या कालावधीतील नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र जवळ असणे आवश्यक आहे.

१७) अंशकालीन कर्मचाऱ्यांना त्यांच्या अनुभवाची सेवायोजन कार्यालयाकडे नोदणी करणे आवश्यक आहे. अर्जामध्ये सेवायोजन कार्यालयाकडील नोंदणी क्रमांकाचा उल्लेख करावा. शासन निर्णय दिनांक १९मार्च ९८ नुसार अंशकालीन काम केलेल्या उमेदवारांना विहित अटी पूर्ण करित असल्यास नियमानुसार गुण देण्यात येतील. सदरचे गुण उमेदवारांस मिळालेल्या लेखी गुणामध्ये समाविष्ठ केले जातील. उमेदवाराने अर्जामध्ये अंशकालिन सेवेसंबधी माहिती नमूद न केल्यास त्यास या शासन निर्णयाचा फायदा मिळणार नाही.

१८) उमेदवार माजी सैनिक असल्यास त्याने जिल्हा सैनिक कल्याण बोर्डामध्ये नाव नोंदणी केलेले प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

२०) अपंग प्रवर्गातील उमेदवारांजवळ अपंगत्वाचे प्रमाण किमान ४० टक्के अपंगत्व असल्याबाबतचे जिल्हा शल्यचिकित्सकांनी दिलेले वैद्यकीय प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

२१) शासन निर्णय क्र.अनिओ-१००५/१२६/सेवा ४ दि.३१/१०/०५ व १/१/०५ रोजी किंवा त्यानंतर ज्यांची शासकीय सेवेत नियुक्ती होईल त्यांना नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती योजना लागू ठरेल. सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागू राहणार नाही. निवड झालेल्या उमेदवारांना शासनाच्या प्रचलित नियमानुसार वेतन व भत्ते मिळतील

२२) अत्युंच्च गुणवत्ताधारक खेळांडूसाठी असलेल आरक्षण शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग व क्रिडा विभाग क्र.रक्रिधो-२००२/प्र.क्र.६८/क्रियुसे-२ दिनांक ३०/४/०५ मधील तरतूदीनसार राहील. अत्युच्च गुणवत्ताधारक खेळांडुसाठी त्यांची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन उच्च वयोमर्यादा ५ वर्षापर्यत शिथिलक्षम राहील. खुल्या प्रवर्गातील अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी असलेले आरक्षण समाजातील उन्नत व प्रगत गटातील उमेदवारांना अनुज्ञेय नाही. खेळाडू प्रमाणपत्र हे राष्ट्रीय व राज्य स्तरावरील ( शासन निर्णय परिशिष्ट -अ मधील नमूद ) खेळाचे प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्यांचे असले पाहिजे.

२३) शासन परिपत्रक क्र.न्याव-२००७/स.न्या./प्र.क्र.१०३/(भाग-३)/१६-अ दि.१९/१०/०७ नुसार अपंगाचा आरक्षित पदे सामाजिक प्रवर्गात न दर्शविता, ती स्वतंत्रपणे दर्शविण्यात आलेली आहेत. निवड झालेल्या उमेदवारांना ते ज्या सामाजिक प्रवर्गातील असतील त्याच प्रवर्गात समांतर आरक्षण म्हणून सामावून घेण्यात येईल.

२४) उमेदवाराने जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या रिक्त पदांचा बारकाईने अभ्यास करावा. उमेदवाराने अर्जामध्ये नमूद केलेली सर्व माहिती बरोबर आहे असे गृहित धरुन कोणत्याही टप्प्यावर पडताळणीच्या अधिन राहून अर्ज स्विकृत करण्यात येत आहे. उमेदवाराने ज्या प्रकारातील पदांसाठी अर्ज केला आहे त्या पदासाठी आवश्यक त्यासर्व अर्हता /आरक्षण उमेदवार धारण करित नसल्याचे कोणत्याही टप्प्यावर निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल.

**२५) सेवायोजन किंवा प्रकल्प कार्यालयात नांव नोंदणी केलेल्या उमेदवारांनी देखिल विहीत नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे.**

२६) पात्र उमेदवारांना लेखी परिक्षेचा दिनांक, वेळ व ठिकाण लेखीपरीक्षा प्रवेश पत्राव्दारे कळविण्यांत येईल.

२७) परिक्षा एका सत्रात होणार असल्याने उमेदवाराने एका पदासाठीच अर्ज करणे हिताचे होईल.

(प्रकाश महाजन)
अपर आयुक्त
आदिवासी विकास,नाशिक

## अर्जाचा नमूना

प्रति

पोष्ट बॉक्स नंबर - ९७०६
बोरीवली (पुर्व),
मुंबई ४०० ०६६.

| उमेदवाराचा अलिकडच्या काळातील पासपोर्ट आकाराचा फोटो येथे चिटकवावा. |
|---|

१) अर्ज करीत असलेल्या पदाचे नांव :

२) अर्ज करीत असलेल्या पदाचा कोड :

( या अर्जात रकाना क्र ३ ते ६ मधील सर्व माहिती इंग्रजी ठळक अक्षरात इंग्रजी अंकात लिहिणे आवश्यक आहे. अर्जावर संगणकाद्धारे प्रक्रिया केली जाणार आहे. )

३) संपूर्ण नांव (इंग्रजीत) (आडनाव प्रथम ) ( नावांच्या दोन भागांमध्ये एक चौकोन रिक्त सोडावा )

| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

४) पत्रव्यवहाराचा पत्ता ( इंग्रजीत )

| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

५)

| जन्म दिनांक | दिनांक | | महिना | | वर्ष | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | 1 | 9 | | |

६)

| दि.१ ऑगष्ट २००९ रोजी असलेले वय | वर्ष | | महिना | | दिवस | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

७) सामाजिक प्रवर्ग :

| प्रवर्ग विषयक वर्गवारी ( आवश्यक रकान्यात चिन्हाची खूण करावी. | अ. जा. | अ. ज. | विजा अ | भज ब | भज क | भज ड | विमाप्र | इमाव | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |

८)

| महाराष्ट्र राज्याचे अधिवासी आहात काय ( खूण करावी.) | होय | नाही |
|---|---|---|
| | | |

९)

<table>
<tr><td rowspan="6">अपग /अंशकालीन /माजी सैनिक असल्यास नमूद करावे.<br>( अशी खूण करावी. )</td><td rowspan="3">अपंग</td><td>अंध</td><td colspan="5"></td></tr>
<tr><td>मूक-बधीर</td><td colspan="5"></td></tr>
<tr><td>अस्थीव्यंग</td><td colspan="5"></td></tr>
<tr><td>अंशकालीन कर्मचारी</td><td></td><td>अंशकालीन सेवेचा कालावधी</td><td>वर्ष</td><td></td><td>महिने</td><td></td></tr>
<tr><td>स्वातंत्र्यसैनिक</td><td></td><td colspan="5"></td></tr>
<tr><td>माजी सैनिक</td><td></td><td colspan="5"></td></tr>
</table>

१०.  लिंग    पुरुष   स्त्री

११. शैक्षणिक अर्हता.

| अ. क्र. | परीक्षा | उत्तीर्ण वर्ष (इंग्रजी अंकात ) | मुख्य विषय | दुय्यम विषय | एकूण गुण | प्राप्त गूण | टक्के वारी | श्रेणी | उत्तीर्ण संधी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | ( इंग्रजी अंकात ) | | | | |
| १ | एस.एस.सी. | | | | | | | | |
| २ | एच.एस.सी. | | | | | | | | |
| ३ | बीए/बीकॉम/बीएसस्सी ( खुण करा ) | | | | | | | | |
| ४ | एम.ए.एमएस्सी ( खुण करा ) | | | | | | | | |
| ५ | बीएड./बीपीएड ( खुण करा ) | | | | | | | | |
| ६ | बीएसडब्ल्यू | | | | | | | | |
| ७ | एम.एस.डब्ल्यू | | | | | | | | |
| ८ | इतर | | | | | | | | |

**शैक्षणिक अर्हता पद कोड क्रमांक ८ करीता -**

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | केंद्रीय भरतीपूर्व निवड परिक्षेतील गुण | | | | | | | | |
| २ | इ.१२ वी परिक्षेतील गुण | | | | | | | | |
| ३ | इ.१० वी परिक्षेतील गुण | | | | | | | | |
| ४ | डी.एड.अभ्साक्रमाच्या लेखी परिक्षेतील गुण | | | | | | | | |
| ५ | इतर | | | | | | | | |
| | अ) खेळ सहभाग | राष्ट्रीयस्तर | | | | | | | |
| | | राज्यस्तर | | | | | | | |
| | | विभागस्तर | | | | | | | |
| | ब) चित्रकला | एलीमेंटरी | | | | | | | |
| | | इंटरमिडि एट | | | | | | | |
| | | ATDअर्हता | | | | | | | |
| | क) गायन /वादन/नृत्य/वकृत्व : अखिल भारतीय गांधर्व विद्यालयाचे मध्यमा पूर्ण अथवा त्या पुढील परिक्षा उत्तीर्ण किंवा उच्च माध्यमिक स्तरावरील हे विषय घेणारे विद्यार्थी गुणदानास पात्र ठरतील. राज्य विज्ञान शिक्षण संस्था अथवा शासनामार्फत आयोजित राज्यस्तरीय अन्य वकृत्व स्पर्धेतील सहभागी विद्यार्थी गुणदानास पात्र ठरतील. | | | | | | | | |

१२. व्यावसायिक अर्हता :

| अ. क्र. | व्यावसायिक अर्हतेचा अभ्यासक्रम (संगणक इ. ) | संस्थेचे नांव | उत्तीर्ण वर्ष | एकूण गुण | प्राप्त गुण | श्रेणी | उत्तीर्ण संधी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १३ | उपरोक्त नमूद अर्हते शिवाय इतर अर्हतेचा तपशिल. | : | | |
| १४. | सेवायोजन/प्रकल्प कार्यालयाचा नोंदणी क्र.सेवायोजन/प्रकल्प कार्यालयाचे नांव ( सेवायोजन/प्रकल्प कार्यालयात नोदणी केलेल्या उमेदवारांनी देखील विहीत नमूऩ्यात अर्ज करणे आवश्यक आहे. ) | : | | |
| १५ | धनादेश (Demand Draft) स्वरुपात भरलेले शुल्क | : | रुपये ( इंग्रजी अंकात ) | |

* टिप लागू नसेल ते खोडावे.

मी असे प्रमाणित करतो / करते की, आदिवासी विकास विभागाची जाहिरात मी काळजीपूर्वक वाचली आणि मला समजली. सदर पदासाठी जाहिरातीत नमूद केलेल्या सर्व अटी व शर्तींची मी पूर्तता करतो /करते याची मी खात्री केली आहे.  या अर्जात दिलेली महिती माझ्या माहितीप्रमाणे बरोबर व खरी आहे. तसेच अर्जात कोणत्याही टप्प्यावर रद्द होईल. परिणामी मिळालेली नोकरी गमविण्यात मी बाधील राहीन व पुढील योग्य त्या कारवाईस पात्र राहीन याची मला जाणीव आहे.

दिनांक :

ठिकाण : अर्जदाराची स्वाक्षरी

( दिनांकासह )

---------------------------------------------------------------------------------------------.

महाराष्ट्र नागरी सेवा ( लहान कुंटंबाचे प्रतिज्ञापत्र ) नियम २००५ अन्वये प्रतिज्ञापत्र

मी श्री/श्रीमती -------------------------------------- श्री-------------------------------------

यांचा / यांची मुलगा/मुलगी/पत्नी वय---------- वर्ष ,राहणार--------------------------------याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहिर करतो /करते की,

१. मी--------------------------- या प्रकारातील पदासाठी ---------------------------- आदिवासी विभागाकरिता माझा अर्ज दाखल केलेला आहे.
२. आज रोजी मला  ---------------- (संख्या ) इतकी हयात अपत्ये आहेत. यापैकी दि.२८ मार्च २००५ यानंतर जन्माला आसलेल्या अपत्यांची संख्या ---------- इतकी आहे. ( असल्यास जन्मदिनांक नमूद करावा.)
३. हयात असलेल्या अपत्यांची संख्या दोनपेक्षा अधिक  असेल तर दिनांक २८ मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या अपत्यांमुळे या पदासाठी मी अपात्र ठरेन याची मला जाणीव आहे.

दिनांक :

ठिकाण : अर्जदाराची स्वाक्षरी

**महत्वाची सूचना :**१) अर्जासोबत आवश्यक प्रमाणपत्राच्या छायाप्रती जोडाव्यात. २) उमेदवाराने अर्ज सादर करण्यापूर्वी खालील बाबींची पूर्तता केली आहे याची खातरजमा करुन घ्यावी.

तपासणी सूची :

१. अर्ज जाहिरातीतील नमून्यानुसारच आहे.
२. अर्जावर अलिकडील छायाचित्र चिकटविले आहे.
३. अर्जासोबत विहित केलेला किंमतीचा धनाकर्ष जोडणे आवश्यक आहे .
४. अर्जासोबत शैक्षणिक अर्हता व इतर आवश्यक प्रमाणपत्र जोडली आहेत.